## आजचे पंचांग

दिनांक : २९ ऑगस्ट २०२६ वार : शनिवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : भाद्रपद ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : प्रथम तिथी (सकाळी ०९:५६ पर्यंत) त्यानंतर द्वितीया तिथी नक्षत्र : पूर्वाभाद्रपदा नक्षत्र (३० ऑगस्ट पहाटे ०३:४१ पर्यंत) त्यानंतर उत्तराभाद्रपदा नक्षत्र योग : सुकर्मा योग (सकाळी ०६:३५ पर्यंत) त्यानंतर धृति योग करण : कौलव करण (सकाळी ०९:५६ पर्यंत) त्यानंतर तैतुला करण

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

### चार बेस अन् चार टॉपला परवानगीची तयारी

**पुणे :** गणेशोत्सवातील मिरवणुकांमध्ये ध्वनियंत्रणेसाठी दोन बेस आणि दोन टॉपऐवजी चार बेस आणि चार टॉप वापरण्याच्या पर्यायावर पोलिसांकडून सकारात्मक विचार सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. या पर्यायाला शहरातील सुमारे ८० टक्के गणेश मंडळांनी अनुकूल प्रतिसाद दिल्याचेही सांगण्यात येत आहे. गणेशोत्सव आणि दहीहंडीच्या पार्श्वभूमीवर ध्वनियंत्रणेच्या वापराबाबत पोलीस प्रशासन आणि गणेश मंडळांच्या प्रतिनिधींमध्ये सातत्याने चर्चा सुरू आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३३१ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### झेरॉक्स दुकानात साडेतीन हजार एसआयआर फॉर्म, भाजप कार्यकर्त्यावर गुन्हा दाखल; रोहित पवारांची निवडणूक आयोगाकडे अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी मुंबई / प्रतिनिधी**

जिल्ह्यातील खारघरमध्ये एसआयआर फॉर्मवरून राजकीय राडा झाल्याची घटना समोर आली आहे. एका झेरॉक्स दुकानात हजारो एसआयआर फॉर्म झेरॉक्स केले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी दुकानात धाव घेतली. यावेळी हे फॉर्म झेरॉक्ससाठी घेऊन आलेला व्यक्ती भाजपचा युवा पदाधिकारी असल्याचे समोर आले. याप्रकरणी, ४ बीएलओंना निलंबित करण्यात आले असून, पोलिसांनी गुन्हा देखील दाखल केला आहे. मात्र, यात केवळ बीएलओंना निलंबित करून भागणार नाही, तर त्यांना आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे.

खारघरमधील एका झेरॉक्स दुकानात हजारो एसआयआर फॉर्म झेरॉक्स केले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी दुकानात धाव घेतली. त्यावेळी, ठाकरे गट आणि भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये झटापट झाली. खारघर पोलीस या प्रकरणाची दखल घेत नसल्याने पोलीस ठाण्यात ठाकरे गटाने ठिय्या आंदोलन केले. अखेर भाजप कार्यकर्ता सुरज पाटील याच्यावर खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पाच बीएलओ प्रतिनिधींना रायगड जिल्हाधिकारी यांनी निलंबित केले आहे. भाजप कार्यकर्ता सुरज पाटील याच्याकडून ३५ हजार एसआयआर अर्ज ताब्यात घेवून सील करण्यात आले आहेत. त्यांना आदेश देणारे अधिकार कोण आहेत? तेही निलंबित झाले पाहिजेत आणि भाजप कार्यकर्त्यावरही कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी केली. महत्त्वाचे म्हणजे जागरुक नागरिकांमुळे हा प्रकार उघडकीस आला म्हणून लाजेखातर ही कारवाई केली असेल, पण असे अनेक प्रकार जे उघड झालेले नाहीत त्याचे काय? हाही प्रश्न आहे आणि निवडणूक आयोगाने याचं उत्तर दिले पाहिजे, अशी मागणीही रोहित पवारांनी केली.

# ५३ हजार लाडक्या बहिणींचा जुलैचा हप्ता रखडला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई / प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांची पडताळणी आणि ई-केवायसी प्रक्रियेनंतर अनेक महिलांची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आली आहेत. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून जुलै महिन्याचा १,५०० रुपयांचा हप्ता 'ओवाळणी' म्हणून वितरित केला जात आहे. मात्र, विविध कारणांमुळे सुमारे ५३ हजार ६३७ महिलांना जुलै महिन्याचा हप्ता मिळणार नसल्याचे माहिती समोर आले आहे. यामध्ये ६५ वर्षांपेक्षा अधिक वय झालेल्या महिलांची संख्या मोठी आहे.

राज्य सरकारने जून २०२४ मध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. योजनेच्या सुरुवातीला लाभार्थी महिलांची संख्या मोठी होती. मात्र, त्यानंतर आधार प्रमाणीकरण, ई-केवायसी, उत्पन्नाची अट, कुटुंबातील शासकीय कर्मचारी, इतर शासकीय योजनांचा लाभ तसेच योजनेतील इतर पात्रता निकषांची पडताळणी करण्यात आली. या प्रक्रियेत मोठ्या



प्रमाणावर लाभार्थी अपात्र ठरले. एकूण २ कोटी ४८ लाख महिलांनी योजनेसाठी अर्ज केले होते. त्यापैकी एप्रिल अखेर सुमारे ९२ लाख नोंदी अपात्र ठरवण्यात आल्या. त्यामुळे योजनेतील पात्र लाभार्थी महिलांची संख्या सुमारे १.६५ कोटींवर आली आहे.

तर रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर २५ ऑगस्टपासून जुलै महिन्याच्या हप्त्याचे वितरण सुरू करण्यात आले. सामाजिक न्याय विभाग आणि वित्त विभागाकडून उपलब्ध झालेल्या निधीतून लाभार्थी महिलांच्या खात्यांमध्ये गुरुवारी सायंकाळपर्यंत राज्यातील १ कोटी ४१ लाख ८५ हजार खात्यांमध्ये सुमारे २ हजार ९५ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. मात्र ६५ वर्षांची वयोमर्यादा ओलांडलेल्या महिलांना यापुढे योजनेचा लाभ घेता येणार नाही. परिणामी सुमारे ५३ हजार ६३७ महिलांना जुलै महिन्याचा १,५०० रुपयांचा हप्ता मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, योजना सुरू झाल्यानंतर आलेल्या पहिल्या रक्षाबंधनाच्या काळात सरकारने एकाच वेळी तीन महिन्यांचे म्हणजेच ४,५०० रुपयांचे अनुदान महिलांच्या खात्यांमध्ये जमा केले होते. या रकमेचा सरकारकडून 'रक्षाबंधणाची ओवाळणी' म्हणून प्रचार करण्यात आला होता. यंदाही रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर जुलै महिन्याचा १,५०० रुपयांचा हप्ता 'ओवाळणी' म्हणून दिला जात आहे.

## मराठा समाजाला दिलासा; वंशावळ जुळवणी समित्यांना आणखी वर्षभराची मुदतवाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई / प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील पुन्हा आंदोलनाची भूमिका घेत असतानाच राज्य सरकारने मराठा समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेल्या वंशावळ जुळवणी प्रक्रियेला आणखी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रक्रियेतील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी संबंधित समित्यांना अतिरिक्त वेळ मिळणार आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने २५ ऑगस्ट २०२६ रोजी यासंदर्भात शासन निर्णय जारी केला आहे. त्यानुसार तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या तालुका स्तरावरील वंशावळ जुळवणी समित्यांचा कार्यकाळ ३० जून २०२७ पर्यंत वाढविण्यात आला आहे. यापूर्वी या समित्यांचा कार्यकाळ ३० जून २०२६ रोजी संपला होता. मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देताना उपलब्ध पुराव्यांची वैधानिक तसेच प्रशासकीय पातळीवर तपासणी केली जाते. त्यासाठी २५ जानेवारी २०२४ रोजी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली तालुका स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली होती. संबंधित समित्यांकडून वंशावळ जुळवणी करून पात्र व्यक्तींच्या जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली जाते. मात्र, काही जिल्ह्यांमध्ये वंशावळ जुळवणीची अनेक प्रकरणे अद्याप प्रलंबित असल्याने समित्यांना मुदतवाढ देण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. त्यानुसार शासनाने १ जुलै २०२६ ते ३० जून २०२७ या कालावधीसाठी समित्यांना एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. यापूर्वीच्या शासन निर्णयातील सर्व तरतुदी या मुदतवाढीच्या कालावधीतही लागू राहणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, मराठा आरक्षण आणि कुणबी नोंदीच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील आंदोलनाची भूमिका घेत असताना सरकारकडून हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे वंशावळ जुळवणीची प्रकरणे प्रलंबित असलेल्या मराठा समाजातील पात्र नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. समित्यांना आणखी एक वर्षाचा कालावधी मिळाल्याने प्रलंबित वंशावळ जुळवणी प्रकरणांची तपासणी पूर्ण करण्यासाठी प्रशासनाला पुरेसा वेळ मिळणार आहे. त्यामुळे पात्र नागरिकांना कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रक्रियेला वेग येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## औषध निरीक्षक भरतीचा पेपर मिळवण्यासाठी मोजले ५० लाख?

### ऋतुजा पाटीलचे नवे व्हॉट्सअप चॅट समोर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

नुकतेच एमपीएससीचा औषध निरीक्षक भरतीचा पेपर फुटल्याने राज्यात मोठा गदारोळ निर्माण झाला आहे. या प्रकरणातील आरोपी ऋतुजा पाटीलचे अनेक चॅट सध्या व्हायरल होत असून, आता नवे व्हॉट्स ॲप चॅट समोर आले आहेत. या नव्या चॅटमध्ये पेपर फोडण्यासाठी तब्बल ५० लाख रूपये मोजल्याचा दावा केला जात आहे. औषध निरीक्षक परीक्षेचा पेपर परीक्षेआधीच मिळवण्यासाठी ५० लाख रूपये भरले आहेत असे ऋतुजा या चॅटमध्ये सांगत असल्याचे दिसून आले आहे.

एमपीएससी औषध निरीक्षक भरती परीक्षेचा पेपर फुटला. त्याच्या चौकशीत ५ लाख रूपये देण्यात आल्याची बाब समोर आली होती. मात्र आता ऋतुराजाच्या नव्या लीक चॅटमध्ये ५० लाख रूपयांचा दावा केल्याने एकच खळबळ उडाली आहे. एमपीएससीतील तीन अधिकारी सध्या गुन्हे शाखेच्या अटकेत असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. मात्र आता ऋतुजाचे नवे चॅट समोर आले अन पेपरफुटीमध्ये पैशाचा मोठा खेळ झाल्याची शंका व्यक्त केली जाऊ लागली आहे.

आकडा ऐकून सर्वांच्याच भूवया उंचावल्या आहेत. आता पेपर फक्त ५ लाखात फुटला की त्याची आणखी मोठी रक्कम ऋतुजाच्या वडिलांनी मोजली याचा तपास सुरू करण्यात आला आहे.

## दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची सुनावणी पूर्ण; न्यायालयाने निकाल राखून ठेवला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या सहा वर्षांपासून चर्चेत असलेल्या दिशा सालियन मृत्यू प्रकरणातील सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात पूर्ण झाली असून, दोन्ही बाजूंचे युक्तिवाद संपल्यानंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. न्यायाधीश कोतवाल यांनी या प्रकरणाचा निकाल राखून ठेवत लवकरच निर्णय दिला जाईल, असे संकेत दिले आहेत.

सुनावणीदरम्यान दिशा सालियन यांच्या मृत्यूनंतर झालेल्या दुखापती, चेहऱ्यावरील जखमा आणि पोस्टमॉर्टेम अहवालातील निष्कर्षांवर न्यायालयात महत्त्वपूर्ण चर्चा झाली. १२ व्या मजल्यावरून पडल्याचा दावा असताना चेहऱ्याचा अत्यंत नाजूक भाग फ्रॅक्चर न होता केवळ दात फ्रॅक्चर कसे झाले, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला. यावर सरकारी वकील शिशिर हिरे यांनी पोस्टमॉर्टेम अहवालाचा संदर्भ देत दिशा सालियन समोरच्या बाजूने पडल्या होत्या आणि जमिनीवर आदळताना पहिला आघात दातांवर झाल्याने ते फ्रॅक्चर झाले, असा युक्तिवाद केला. मात्र, इतक्या मोठ्या उंचीवरून पडल्याने झालेल्या तीव्र आघातात चेहऱ्याचा नाजूक भाग फ्रॅक्चर का झाला नाही, असा प्रश्न न्यायालयाने पुन्हा उपस्थित केला. दरम्यान, तपास पुन्हा सुरू झाल्यानंतर १५ जानेवारी २०२४ रोजी दिशा सालियन यांच्या वडिलांचा जबाब नोंदवण्यात आल्याचे सरकारी वकील हिरे यांनी न्यायालयाला सांगितले. एका व्यवहाराशी संबंधित कराराची प्रक्रिया रद्द झाल्यानंतर दिशा सालियन नैराश्यात गेल्या होत्या आणि त्यातून त्यांनी आत्महत्या केल्याचे त्यांच्या वडिलांनी जबाबात म्हटल्याचा दावा सरकारी पक्षाने केला. सरकारी वकिलांच्या म्हणण्यानुसार, दिशा सालियन यांच्या वडिलांनी आपल्या जबाबात, आमची आदित्य ठाकरे यांच्याशी कधीही भेट झालेली नाही आणि मी पूर्ण शुद्धीत हा जबाब देत आहे, असे म्हटले आहे. दिशा सालियन यांच्या आई-वडिलांनी दंडाधिकाऱ्यांसमोरही जबाब नोंदवला असून, त्यात कोणतीही तक्रार नसल्याचे सांगितल्याचा युक्तिवादही सरकारी पक्षाने केला. सुनावणीदरम्यान दिशा सालियन यांच्यासोबत राहणारे रोहन राय यांच्या जबाबाचाही सरकारी वकील हिरे यांनी संदर्भ दिला. दिशा सालियन यांच्या हिताची आणि त्यांच्या कल्याणाची सर्वाधिक चिंता असलेल्या व्यक्तींमध्ये रोहन राय यांचे स्थान महत्त्वाचे असल्याचे सरकारी पक्षाने नमूद केले. तपासादरम्यान सर्वप्रथम रोहन राय यांचा जबाब नोंदवण्यात आल्याचेही न्यायालयाला सांगण्यात आले. सरकारी वकिलांच्या युक्तिवादानुसार, लॉकडाऊनच्या काळात रोहन राय दिशा सालियन यांच्यासोबत राहत होते. त्यांच्या जबाबात दिशा आणि त्यांच्या वडिलांमध्ये वाद झाला होता तसेच घटनेपूर्वी तीन महिन्यांपासून दोघांमध्ये संवाद नव्हता, असे नमूद करण्यात आले होते. रोहन राय यांनी कोणत्याही घातपाताची शक्यता नाकारली असून, दिशा सालियन या तीव्र तणावाखाली असल्याने त्यांनी आत्महत्या केल्याचे म्हटल्याचा दावा सरकारी पक्षाने केला. दिशा सालियन यांच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचे कोणतेही पुरावे वैद्यकीय अहवालात आढळले नसल्याचा दावा सरकारी पक्षाने केला. या प्रकरणात डॉक्टरांचा सीआरपीसी कलम १६४ अंतर्गत जबाब नोंदवण्यात आल्याचेही न्यायालयाला सांगण्यात आले. दिशा सालियन यांचे पोस्टमॉर्टेम करणारे डॉ. जाधव यांच्या जबाबाचा संदर्भ देत, लैंगिक अत्याचाराचे कोणतेही पुरावे नसल्याचे सरकारी वकिलांनी म्हटले. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर न्यायाधीश कोतवाल यांनी प्रकरणाचा निकाल राखून ठेवला आहे. त्यामुळे गेल्या सहा वर्षांपासून चर्चेत आणि राजकीय वर्तुळातही गाजत असलेल्या दिशा सालियन मृत्यू प्रकरणात मुंबई उच्च न्यायालय काय निर्णय देते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### याचे राजकिय भांडवल करता येणार नाही

सहा वर्षांनंतर या प्रकरणाचे राजकीय भांडवल करता येणार नाही, असा युक्तिवादही सरकारी वकील शिशिर हिरे यांनी न्यायालयात केला. व्यक्तींमध्ये मतभेद असू शकतात, मात्र प्रत्येक मतभेदातून गुन्हेगारी स्वरूपाचा प्रकार सिद्ध होत नाही, असेही त्यांनी नमूद केले. या प्रकरणात तक्रारी किंवा हरकती असल्यास पुढे येण्यासाठी जाहिरातही देण्यात आली होती. मात्र, त्यानंतर कोणतीही व्यक्ती तक्रार घेऊन पुढे आली नसल्याचे सरकारी वकिलांनी न्यायालयाला सांगितले.

## सोनिया गांधींच्या आत्मचरित्रावरून नवा वाद; प्रकाशनाबाबत 'पेंग्विन'ची भूमिका स्पष्ट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : विशेष प्रतिनिधी**


काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या आगामी आत्मचरित्रावरून नवा वाद निर्माण झाला आहे. **"Belonging : A Journey of Love' G$** या आत्मचरित्राच्या भारतातील प्रकाशनाबाबत पेंग्विन रँडम हाऊस इंडियाने शुक्रवारी आपली भूमिका स्पष्ट केली. भारतात या पुस्तकाचा प्रकाशक पेंग्विन रँडम हाऊस इंडिया नसल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. काही आठवड्यांपूर्वी एका मीडिया रिपोर्टमध्ये सोनिया गांधी यांनी पुस्तकातील काही संपादकीय बदल स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे पेंग्विन रँडम हाऊस इंडियाने प्रकाशनातून माघार घेतल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, कंपनीने हा दावा फेटाळून लावला आहे. पुस्तक प्रकाशित करण्याबाबत पेंग्विनने रस दाखवला होता आणि प्रकाशनाची तयारीही केली होती; मात्र लेखकाने काही बदल स्वीकारले नाहीत म्हणून प्रकाशकाने माघार घेतल्याचा दावा चुकीचा असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

पुस्तकाच्या प्रकाशन प्रक्रियेत लेखकाने दिलेल्या माहितीची तथ्य पडताळणी करणे तसेच आवश्यक त्या सूचना करणे हा प्रकाशकाच्या प्रक्रियेचा भाग असल्याचे पेंग्विनने स्पष्ट केले. ही केवळ प्रकाशकाची जबाबदारी नसून त्याचा अधिकारही असल्याचे कंपनीने नमूद केले आहे. सोनिया गांधी यांच्यासोबत झालेल्या गोपनीय चर्चेवर अधिक भाष्य करण्यास मात्र कंपनीने नकार दिला.

दरम्यान, अमेरिकेतील **Alfred A. Knopf** यांनी यापूर्वी **"Belonging : A Journey of Love' G$** हे पुस्तक १० नोव्हेंबर रोजी प्रकाशित होणार असल्याची घोषणा केली आहे. मात्र, भारतात या पुस्तकाचे प्रकाशन आणि वितरण नेमके कोण करणार, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही. ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर पुस्तकाची ई-बुक आवृत्ती २,६१५ रुपयांना प्री-ऑर्डरसाठी उपलब्ध असल्याचे दिसत आहे.

७९ वर्षीय सोनिया गांधी यांच्या आयुष्यातील अनेक महत्त्वपूर्ण घटनांचा वेध या आत्मचरित्रातून घेतला जाणार आहे. इटलीतील बालपणापासून भारतात येण्यामागील प्रेमकहाणी, शक्तिशाली गांधी कुटुंबात झालेला विवाह आणि पती राजीव गांधी यांच्या निधनानंतरचा संघर्ष याबाबत त्या या पुस्तकातून आठवणी मांडणार आहेत.

राजीव गांधी यांच्या हत्येनंतरचा काळ, त्यानंतर सोनिया गांधी यांचा सक्रिय राजकारणात झालेला प्रवेश आणि २००४ मध्ये पंतप्रधानपद स्वीकारण्यास त्यांनी दिलेला नकार यांसारख्या राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण घटनांवरही पुस्तकात प्रकाश टाकण्यात येणार आहे. प्रकाशकाच्या माहितीनुसार, सोनिया गांधी यांच्या आयुष्यातील प्रेम, वैयक्तिक संघर्ष, शोकांतिका आणि त्यानंतरचा भारतीय राजकारणातील प्रवास असा विस्तृत पट या आत्मचरित्रातून उलगडणार आहे. त्यामुळे पुस्तकाच्या प्रकाशनापूर्वीच त्याबाबत उत्सुकता निर्माण झाली असून, भारतातील प्रकाशनाची जबाबदारी कोणत्या प्रकाशकाकडे जाणार, याकडेही लक्ष लागले आहे.



## संपादकीय

### न्यायमूर्ती, तुम्हीसुद्धा?

न्यायव्यवस्था ही लोकशाहीच्या मंदिरातील शेवटची आशा मानली जाते. सरकार चुकले, प्रशासन ढिम्म झाले, राजकीय व्यवस्था स्वार्थात अडकली, तरी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला की न्याय मिळेल, असा सामान्य नागरिकाचा विश्वास असतो. हा विश्वास केवळ कायद्याच्या पुस्तकांवर टिकलेला नसतो; तो न्यायमूर्तींच्या चारित्र्यावर, प्रामाणिकपणावर आणि निष्पक्षतेवर टिकलेला असतो. म्हणूनच एखाद्या न्यायमूर्तीवर गैरव्यवहाराचे गंभीर आरोप झाले की ते केवळ एका व्यक्तीपुरते प्रकरण राहत नाही. त्याची झळ थेट संपूर्ण न्यायव्यवस्थेच्या विश्वासार्हतेला बसते.

दिल्ली उच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी कथितरीत्या मोठ्या प्रमाणात रोकड सापडल्याच्या प्रकरणाने देशभर खळबळ उडवली. त्यानंतर या प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती स्थापन झाली. समितीने गंभीर स्वरूपाचे निष्कर्ष नोंदवल्याचे समोर आले. पुढे न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरोधात महाभियोगाची प्रक्रिया सुरू करण्याची वेळ आली. या सगळ्या घटनाक्रमाने एक अस्वस्थ करणारा प्रश्न देशासमोर उभा केला आहेन्याय देणाऱ्यांच्या नैतिकतेची कसोटी कोण घेणार?

न्यायालयाने राजकीय सत्तेवर अंकुश ठेवायचा, प्रशासनाला जबाबदार धरायचे आणि नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करायचे. पण न्यायव्यवस्थेतीलच एखाद्या घटकावर भ्रष्टाचार अथवा गैरव्यवहाराचा आरोप झाला, तर त्या आरोपांची चौकशी किती पारदर्शकपणे होते, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. कारण न्यायालयीन स्वायत्तता म्हणजे न्यायमूर्तींना अमर्यादित संरक्षण नव्हे. स्वायत्तता आणि उत्तरदायित्व यांचा समतोल राखणे हीच खरी कसोटी आहे.

या प्रकरणात आणखी चिंताजनक बाब म्हणजे अशा आरोपांवर तत्काळ आणि स्पष्ट उत्तर मिळण्याऐवजी अनेकदा प्रक्रियेच्या पडद्याआड प्रश्न लांबणीवर पडतात. सामान्य नागरिकावर भ्रष्टाचाराचा संशय आला तर तपास यंत्रणा क्षणार्धात सक्रिय होते. सरकारी कर्मचाऱ्यावर आरोप झाला तर निलंबन, चौकशी, गुन्हा अशा कारवाया झपाट्याने होतात. मग न्यायव्यवस्थेतील सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीबाबत निकष वेगळे का असावेत? कायद्यापुढे सर्व समान असतील, तर न्यायमूर्तीही त्याला अपवाद कसे?

न्यायमूर्ती वर्मा प्रकरणातील आरोप सिद्ध झाले आहेत, असे गृहीत धरून निष्कर्ष काढणे योग्य नाही. आरोप, चौकशी आणि अंतिम निर्णय यांच्यातील फरक लोकशाहीने विसरता कामा नये. पण आरोप गंभीर असतील, चौकशी समितीने गंभीर निरीक्षणे नोंदवली असतील आणि संसदेत महाभियोगाची प्रक्रिया सुरू झाली असेल, तर या संपूर्ण प्रक्रियेबाबत जनतेला पारदर्शक माहिती मिळणे आवश्यक आहे. कारण न्याय केवळ झाला पाहिजे असे नाही; तो होताना दिसलाही पाहिजे.

न्यायालयीन विलंब, प्रलंबित खटले, महागडी न्यायप्रक्रिया आणि सर्वसामान्यांना न्याय मिळवताना येणाऱ्या अडचणी यामुळे आधीच न्यायव्यवस्थेबद्दल अस्वस्थता आहे. त्यात न्यायमूर्तींच्या आचरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले तर परिस्थिती अधिक गंभीर होते. न्यायालयाचा आदेश नागरिक मानतो कारण त्यामागे केवळ कायद्याची ताकद नसते; त्यामागे न्यायाधीशांच्या निष्कलंक प्रतिमेची नैतिक ताकद असते.

राजकारण्यांवर आरोप झाले की जनता प्रश्न विचारते. अधिकाऱ्यांवर आरोप झाले की माध्यमे प्रश्न विचारतात. उद्योगपतींवर आरोप झाले की तपास यंत्रणा प्रश्न विचारते. मग न्यायमूर्तींवर गंभीर आरोप झाले की प्रश्न विचारणे हे न्यायालयाचा अवमान ठरू नये. उलट, न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा वाचवायची असेल तर प्रश्न विचारण्याची मुभा अधिक असली पाहिजे.

कारण लोकशाहीत कोणतीही संस्था प्रश्नांच्या पलीकडे नसते. संसदेला जनतेसमोर उत्तर द्यावे लागते, सरकारला द्यावे लागते, प्रशासनाला द्यावे लागते. मग न्यायव्यवस्थेलाही आपल्या संस्थात्मक शुचितेबाबत उत्तरदायी राहावेच लागेल.

आजचा प्रश्न न्यायमूर्ती वर्मा यांच्यापुरता मर्यादित नाही. प्रश्न आहेन्यायाच्या आसनावर बसलेल्या व्यक्तीच्या नैतिकतेवर संशय निर्माण झाला तर त्या आसनाची प्रतिष्ठा कोण जपणार?

न्यायालयाच्या हातात इतरांना न्याय देण्याचा अधिकार आहे. पण त्या अधिकारासोबत स्वतःच्या आचरणाची कठोर तपासणी स्वीकारण्याची जबाबदारीही आहे. न्यायदेवतेच्या डोळ्यांवर पट्टी असते; पण न्यायमूर्तींच्या आचरणावर पडदा असता कामा नये.

म्हणूनच हा सवाल केवळ एका न्यायमूर्तीला नाहीन्यायव्यवस्थेलाच आहे : न्यायमूर्ती, तुम्हीसुद्धा?

## दिव्यांगांसाठी सुविधा, रोजगार आणि प्रशिक्षणाला चालना

### पिंपरी-चिंचवड अधिक समावेशक करण्याचा निर्णय; दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या बैठकीत विविध महत्त्वपूर्ण निर्णय

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

दिव्यांग नागरिकांना समान संधी, आवश्यक सुविधा आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून त्यांचे जीवन अधिक सुलभ व सक्षम करण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देण्याच्या दृष्टीने फाऊंडेशनच्या संचालक मंडळाची बैठक आयुक्त तथा फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडली.

बैठकीत दिव्यांगांचे शिक्षण, रोजगार, कौशल्यविकास, पुनर्वसन, आरोग्य आणि सर्वांगीण सक्षमीकरण याबाबत विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. बैठकीस अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे, कंपनी सचिव गिरीश परळीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी, फाऊंडेशनचे सल्लागार विजय कान्हेकर, वास्तुविशारद व सल्लागार अभिजित मुरुगकर यांच्यासह संबंधित अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

**उद्यानांमध्ये साकारले जाणार 'संवेदनानुभव उद्यान'**

दिव्यांग मुलांना आणि व्यक्तींना निसर्गाच्या सान्निध्यात आनंददायी तसेच संवेदनात्मक अनुभव मिळावा, यासाठी शहरातील विविध उद्यानांमध्ये 'संवेदनानुभव उद्यान' विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या उद्यानांमध्ये स्पर्श, ध्वनी, सुगंध आणि दृश्य अनुभवांच्या माध्यमातून दिव्यांग मुलांच्या संवेदनात्मक विकासाला चालना देण्यात येणार आहे. त्याचबरोबर दिव्यांगांसाठी मनोरंजन, विरंगुळा आणि आनंदाचे हक्काचे स्थान उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**उद्योगांच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी**

दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या कौशल्य आणि क्षमतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या उत्कृष्टता केंद्राच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवड तसेच परिसरातील विविध औद्योगिक वसाहतींमधील उद्योग आणि आस्थापनांशी समन्वय साधण्यात येत आहे.

आतापर्यंत १२०० पेक्षा अधिक दिव्यांग व्यक्तींची नोंदणी झाली असून, त्यापैकी सुमारे ६५० व्यक्तींची माहिती तपासणी आणि कौशल्यानुसार जुळवणी पूर्ण झाली आहे. यातील ३५ दिव्यांग व्यक्तींना विविध आस्थापनांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असून, त्या समाधानकारकपणे कार्यरत असल्याची माहिती फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख यांनी बैठकीत दिली.

दिव्यांग व्यक्तींना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी भारतीय उद्योग महासंघाचे संचालक प्रसाद बच्छाव यांच्याशी संवाद साधला. त्यांच्या माध्यमातून विविध कंपन्यांशी समन्वय साधून दिव्यांगांच्या रोजगारासाठी विशेष चर्चासत्र आयोजित करण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

दिव्यांग व्यक्तींना केवळ मदत किंवा सवलतींपुरते मर्यादित न ठेवता त्यांच्या कौशल्याला संधी, रोजगाराला व्यासपीठ आणि स्वावलंबनाला बळ देण्याच्या दिशेने महापालिकेने पाऊल टाकले आहे. शहरातील सार्वजनिक सुविधा आणि सामाजिक सहभागामध्ये दिव्यांगांचा समान वाटा सुनिश्चित करण्यासाठी आगामी काळातही विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

## संत ज्ञानेश्वर माउलींच्या ७५०व्या जन्मवर्षानिमित्त 'मोगरा फुलला' भक्तिमय संगीत सोहळा उत्साहात

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माउली यांच्या ७५०व्या जन्मवर्षाचे औचित्य साधून संदीप बाळकृष्ण वाघेरे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'मोगरा फुलला' हा भक्तिमय संगीत सोहळा चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृहात भक्तिरसपूर्ण वातावरणात उत्साहात पार पडला. अभंग, ओव्या, आध्यात्मिक विचार आणि सुमधुर गायनाने रंगलेल्या या सोहळ्याला रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

बुधवार, दि. २६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत झालेल्या कार्यक्रमात संत ज्ञानेश्वर माउलींच्या समृद्ध साहित्याचा आणि भक्तिपरंपरेचा सुरेल जागर करण्यात आला. डॉ. गणेश शिंदे यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांचे साहित्य, अध्यात्म आणि भक्तिपरंपरा याविषयी प्रभावी व्याख्यानातून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

प्रसिद्ध गायिका सन्मिता शिंदे यांच्या सुमधुर स्वरातून ज्ञानेश्वर माउलींच्या अभंग-ओव्यांचे भावपूर्ण सादरीकरण झाले. त्यांच्या स्वरांनी सभागृहातील वातावरण भक्तिरसाने भारून गेले. उपस्थित रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या सादरीकरणाला दाद दिली.

ज्ञानेश्वरी विचारांचा नव्या पिढीपर्यंत जागर 'मोगरा फुलला' या उपक्रमातून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या अमृतमय साहित्याचा, आध्यात्मिक विचारांचा आणि महाराष्ट्राच्या समृद्ध संतपरंपरेचा जागर करण्यात आला. ज्ञानेश्वर माउलींच्या अभंग-ओव्यांमधील भक्ती, ज्ञान, अध्यात्म आणि मानवतावादी विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा स्तुत्य प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला. या कार्यक्रमास नगरसेवक संदीप वाघेरे, माजी आमदार विलास लांडे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, स्थायी समिती सदस्या सुलभाताई उबाळे, स्थायी समितीच्या माजी सभापती सीमा सावळे, तसेच प्रियांका कुदळे, अरुणा लंगोटे, राजू बनसोडे, विराज लांडे, अनंत कोऱ्हाळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चंद्रशेखर अहिरराव, जितेंद्र वाटकर, किरण शिंदे, गणेश मंजाळ, राघवेंद्र भांडगे आणि कैलास वाघेरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## वाकडमध्ये हुंडाबळीचा धक्कादायक आरोप; शिल्पा गवारे यांचा मृत्यू, माहेरच्यांचा 'हत्या'चा संशय

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला वाकड परिसरात ४२ वर्षीय विवाहित महिलेने राहत्या घरी गळफास घेऊन जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शिल्पा सचिन गवारे (वय ४२, रा. ईशान सोसायटी, वाकड) असे मृत महिलेचे नाव आहे. तब्बल १७ वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतरही सासरच्या मंडळींकडून शारीरिक व मानसिक छळ होत असल्याचा गंभीर आरोप तिच्या माहेरच्यांनी केला आहे. या प्रकरणामुळे परिसरात संताप आणि हळहळ व्यक्त होत आहे.

शिल्पा यांचे भाऊ संतोष गुलाब कलाटे यांनी वाकड पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी पती सचिन उत्तम गवारे, सासरे उत्तम शिवराम गवारे, सासू संजीवनी उत्तम गवारे आणि दीर संदीप उत्तम गवारे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, त्यांना ताब्यात घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. माहेरच्यांच्या आरोपानुसार, लग्नानंतर शिल्पा यांचा सातत्याने छळ करण्यात येत होता. माहेरून ५१ तोळे सोने, फॉर्च्युनर कार तसेच वडिलांच्या मालमत्तेत व जमिनीमध्ये हिस्सा मिळवून देण्यासाठी तिच्यावर दबाव टाकला जात असल्याचा आरोप आहे. विशेषतः माहेरच्या मालमत्तेवरील हक्क सोडण्याच्या दस्तऐवजावर स्वाक्षरी करण्यास शिल्पा यांनी नकार दिल्यानंतर तिचा छळ आणखी वाढल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेनंतर आणखी एक गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. शिल्पा यांचा मृतदेह घरात आढळला, मात्र घराचा दरवाजा उघडा असल्याचे माहेरच्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे हा आत्महत्येचा प्रकार नसून शिल्पा यांची हत्या करण्यात आली असावी, असा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. मात्र, हा आरोप अद्याप तपासातून सिद्ध झालेला नाही. या प्रकरणातील प्रत्येक पैलू तपासला जात असून, शवविच्छेदन अहवाल आणि अन्य पुराव्यांच्या आधारे मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. तपासातून हत्या झाल्याचे निष्पन्न झाल्यास भारतीय न्याय संहितेतील (इछड) संबंधित हत्येचे कलम वाढविण्यात येईल, अशी माहिती पोलिसांनी दिली. वाकड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रसाद गज्जेवार आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

एका विवाहित महिलेचा संशयास्पद परिस्थितीत झालेला मृत्यू आणि त्यामागे हुंडा, संपत्ती व कौटुंबिक छळाचे आरोप असल्याने या प्रकरणाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. शिल्पाने आत्महत्या केली की तिच्या मृत्यूमागे आणखी काही दडले आहे, याचा उलगडा पोलिस तपास आणि शवविच्छेदन अहवालातून होणार आहे.

## नृत्यकलेतून कलाकारांना परमानंदाची अनुभूती : वरदा वैशंपायन
## लहानग्या रेवा कुंभार हिने ओडिसी नृत्याद्वारे वेधले लक्ष

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी : प्रतिनिधी**

भारतीय अभिजात नृत्यकला व्यक्तीच्या सर्वांगीण विकासात मोलाची भर घालते. नृत्याच्या साधनेतून कलाकाराला परमानंदाची अनुभूती मिळते. त्याचबरोबर मनाची एकाग्रता वाढते आणि शारीरिक व मानसिक क्षमता विकसित होते. नृत्यकलेमध्ये संस्कृतीचे संवर्धन करण्याची ताकद असून, तिच्या माध्यमातून संस्कारक्षम तरुण पिढी घडविता येते, असे प्रतिपादन 'नृत्योपासना भरतनाट्यम आणि ओडिसी नृत्यालय'च्या संस्थापक वरदा वैशंपायन यांनी केले.

'नृत्योपासना भरतनाट्यम आणि ओडिसी नृत्यालय'चे स्नेहसंमेलन पिंपरी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी वरदा वैशंपायन यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाला ज्येष्ठ निरूपणकार रवींद्रजी पाठक, स्नेहल सोमण, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



स्नेहसंमेलनात भरतनाट्यम आणि ओडिसी नृत्याचे मनोहारी सादरीकरण करण्यात आले. विशेषतः लहानग्या रेवा कुंभार हिने केलेल्या ओडिसी नृत्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. ओडिसीचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींमध्ये रेवा ही सर्वात लहान वयाची शिष्या आहे. लहान वयातच अभिजात नृत्याची साधना सुरू करून तिने रंगमंचावर आत्मविश्वासाने आणि सुंदर पदन्यासांसह केलेले सादरीकरण कौतुकास्पद ठरले. वरदा वैशंपायन यांनी रेवा कुंभार तसेच आर्णा गुरु, हंसिनी रमेश आणि हर्षिता बिस्वाल, योगिता भसीन यांच्या समवेत ओडिसी नृत्य सादर केले. या सादरीकरणात ओडिसी नृत्यशैलीतील चौक, त्रिभंगी पदन्यास आणि बटू या नृत्यरचनांनी रसिकांची दाद मिळवली. भरतनाट्यम शिकणाऱ्या तब्बल ४० विद्यार्थीनींनी विविध नृत्यरचनांचे सादरीकरण करून कार्यक्रमात रंगत आणली. विद्यार्थिनींनी मल्लरी, पुष्पांजली, अलारिपू, जतीस्वरम, शब्दम्, कीर्तनम्, अंबाष्टक, जावळी, 'कृष्ण भजन – जरा इतना बात दे कान्हा', बारा ज्योतिर्लिंग श्लोकम्, तिल्लाना आणि अभंग आदी नृत्यरचना सादर केल्या. प्रत्येक सादरीकरणाला उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. अभिजात नृत्यकलेच्या माध्यमातून भारतीय संस्कृती, परंपरा आणि संस्कारांची जपणूक करत नव्या पिढीला कलेची गोडी लावण्याचा संदेश या स्नेहसंमेलनातून देण्यात आला.

## माहेरच्या संपत्तीसाठी विवाहितेचा छळ; आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या पतीसह चौघांवर गुन्हा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पुणे । प्रतिनिधी**

ठिकाण: इशान सोसायटी, वाकड पोलीस लाईन समोर, वाकड, पुणे.

गुन्हा नोंद: वाकड पोलीस ठाणे (गु.र.नं. ४६०/२०२६, इछड कलम १०८, ८५, ११५(२), ३५२, ३५१(२)(३), ३(५)).

नेमकी घटना:

फिर्यादी संतोष गुलाब कलाटे (वय ४७, रा. वाकड) यांच्या बहिणीला (मयत) तिच्या सासरच्या मंडळींनी २००९ पासून सातत्याने माहेरहून पैसे आणण्यासाठी तसेच तिच्या माहेरकडील प्रॉपर्टीच्या कागदपत्रांवर सह्या करण्यासाठी शारीरिक व मानसिक त्रास दिला. वडिलांच्या मिळकतीत हिस्सा मिळवण्यासाठी पती सचिन उत्तम गवारे (वय ४५), सासरे उत्तम शिवराम गवारे (वय ६८), दीर संदीप उत्तम गवारे (वय ४०) व एका महिला आरोपीने संगनमत करून तिला वारंवार मारहाण केली. या असह्य त्रासाला कंटाळून अखेर तिने आत्महत्या केली. याप्रकरणी पतीसह चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून सपोनि भोकरे पुढील तपास करत आहेत.

**क्रिप्टो करन्सीत दामदुप्पट परताव्याचे आमिष; भोसरीतील व्यावसायिकाला १ कोटी ३७ लाखांचा गंडा!**

ठिकाण: लांडगे आळी, भोसरी, पुणे.

गुन्हा नोंद: भोसरी पोलीस ठाणे (गु.र.नं. ४३१/२०२६, इछड कलम ३१८(४), ३५१(१), ३(५)).

नेमकी घटना:

भोसरी येथील व्यावसायिक अमित रामभाऊ लांडगे (वय ४२) यांना क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष आरोपी आशुतोष संजय उन्हाळे (रा. बालेवाडी, पुणे) आणि समाधान शंकर कदम (रा. बालेवाडी, पुणे) यांनी दाखवले. फिर्यादीचा विश्वास संपादन करून १ मे २०२४ पासून वेळोवेळी एकूण १,३७,५७,८६३/- (एक कोटी सदतीस लाख सत्तावन्न हजार आठशे त्रेसष्ठ) रुपयांची गुंतवणूक करून घेतली. त्यानंतर कोणताही परतावा अथवा मुद्दल परत न देता त्यांची कोट्यवधींची फसवणूक केली. याप्रकरणी सपोनि मांदरे अधिक तपास करत आहेत.





**आई आजारी असल्याचे सांगत वृद्धेचे दीड लाखांचे मंगळसूत्र हातचलाखीने पळवले!**

ठिकाण: महादेव मंदिर, भोसे गावठाण, चाकण-शिक्रापूर रोड, ता. खेड.

गुन्हा नोंद: चाकण पोलीस ठाणे (गु.र.नं. ७२३/२०२६, इछड कलम ३१६(२), ३(५)).

नेमकी घटना: भोसे गावठाण येथील महादेव मंदिरात फिर्यादी महिलेच्या सासू दर्शनासाठी गेल्या असताना दोन अनोळखी भामट्यांनी त्यांना गाठले. ''माझी आई आजारी असून ती बरी होण्यासाठी गरजू व वयोवृद्ध व्यक्तीला पैसे दान करायचे आहेत,'' असा बनाव रचून त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर कागदाच्या पुडीत १ लाख ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र (अडीच तोळे) ठेवण्याचा बहाणा करत, त्याऐवजी काचेचे मणी असलेली पुडी पिशवीत ठेवून हातचलाखीने सोन्याचे मंगळसूत्र घेऊन दोघे पसार झाले. याप्रकरणी चाकण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

**चिंचवडमध्ये बायनरी ट्रेडिंगच्या जाळ्यात व्यावसायिक अडकला; १३ लाखांची लूट!**

ठिकाण: प्रेमसागर सोसायटी, रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाजवळ, चिंचवड. गुन्हा नोंद: चिंचवड पोलीस ठाणे (गु.र.नं. ४१०/२०२६, इछड कलम ३१६(२), ३१८(४), ३(५) सह आयटी ॲक्ट ६६(डी), ६६(सी)).

नेमकी घटना: चिंचवड येथील व्यावसायिक प्रमोद हिंमतराम पुरोहित (वय ३३) यांना टेलिग्रामवर कोटेक्स (टींशु) बायनरी ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवून तीन ते चार पट नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवण्यात आले. आरोपी तपसकुमार मोहान्तो, टेलिग्राम हँडल ॲशरश्रवशशुळिप, इन्स्टाग्राम आयडी श्रशसशपवेर्षीॲरवळपस व अन्य लिंकधारकांनी फिर्यादीकडून टप्प्याटप्प्याने १३ लाख २०,३६२ रुपये त्यांच्या बायनान्स आयडीवर भरून घेतले. मात्र, कोणताही परतावा न देता थेट फसवणूक केली. वपोनि चासकर या प्रकरणाचा तपास करत आहेत.

**आळंदीत दररोज ५०० रुपयांच्या परताव्याचे आमिष; अनेकांची ३३ लाख ४४ हजारांची फसवणूक!**

ठिकाण: धानोरे फाटा / चऱ्होली खुर्द, ता. खेड, जि. पुणे.

गुन्हा नोंद: आळंदी पोलीस ठाणे (गु.र.नं. ३५८/२०२६, इछड कलम ३१६(२), ३१८(४), ३(५) सह चझखॠ ॲक्ट ३).

नेमकी घटना: प्रति १ लाख रुपयांच्या गुंतवणुकीवर दररोज ५०० रुपये परतावा देण्याचे बनावट आश्वासन देऊन आरोपींनी नागरिकांना गंडा घातला. फिर्यादी राहुल भोलेनाथ भोसले, योगेश वंजारी (१.७० लाख), यशवंत गावडे (१० लाख) आणि शुभम लोखंडे व मोनिका लोखंडे (६ लाख) यांच्यासह इतर गुंतवणूकदारांकडून एकूण ३३ लाख ४४ हजार ४२५ रुपये जमा करून घेतले. मुद्दल अथवा परतावा न देता पळ काढल्याने आरोपी भागवत गंगाधर पऱ्हाड व एका महिला आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सपोनि वाघ पुढील तपास करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पुणे महापालिकेच्या 'स्वच्छ' निविदेत 'टक्केवारी'चा वास? साहित्यासाठी ८ कोटी ८० लाखांची उधळपट्टी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

पुणे महानगरपालिकेने 'स्वच्छ' संस्थेच्या कचरा वेचकांसाठी मंजूर केलेल्या कोट्यवधींच्या निविदेवरून आता संशयाचे धुके निर्माण झाले आहे. या संपूर्ण निविदा प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणावर 'टक्केवारी' (कमिशन) आणि आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.४,१०० कर्मचाऱ्यांसाठी तब्बल ८ कोटी ८० लाखपुणे शहरात कचरा संकलनाचे महत्त्वाचे काम करणाऱ्या 'स्वच्छ' संस्थेच्या कर्मचाऱ्यांना रेनकोट, हातमोजे, मास्क, जॅकेट आणि चपला यांसारखे आवश्यक सुरक्षा साहित्य पुरवले जाणार आहे. मात्र, या साहित्यासाठी महापालिकेने तब्बल ८ कोटी ८० लाख रुपयांची अवाढव्य निविदा मंजूर केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. साहित्याच्या एकूण गरजेच्या तुलनेत हा खर्च अवाजवी असल्याची चर्चा पालिका वर्तुळात रंगली आहे.७० टक्के महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्नसध्या पुणे शहरात सुमारे ४ हजार १०० स्वच्छ सेवक अहोरात्र काम करत आहेत. विशेष म्हणजे, या एकूण कर्मचाऱ्यांपैकी तब्बल ७० टक्के कर्मचारी या महिला आहेत. त्यामुळे महिला कर्मचाऱ्यांच्या हक्काच्या साहित्याचा वापर करून अधिकारी किंवा कंत्राटदार आपले खिसे भरत आहेत का, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. या कथित 'टक्केवारी'च्या दुर्गंधीमुळे आता या संपूर्ण निविदेची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# हिप्परगा रवा येथे वीजबिल वाटपात दिरंगाई करणाऱ्यांवर कारवाईचे आदेश; कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांच्या भूमिकेचे कौतुक

## दैनिक राज्य लोकतंत्र बातमीचा दणका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोहारा/हिप्परगा रवा । प्रतिनिधी

हिप्परगा रवा परिसरातील वीज ग्राहकांना नियमित व वेळेत वीजबिल मिळत नसल्याने ग्राहकांना मोठा आर्थिक व मानसिक मनस्ताप सहन करावा लागत होता. या गंभीर समस्येवर *'दैनिक राज्य लोकतंत्र न्यूज'*ने सविस्तर वृत्त प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. या बातमीची तात्काळ दखल घेत महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ (महावितरण) लोहारा विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित एजन्सी आणि वायरमनवर योग्य ती कारवाई करण्याचे कडक आदेश दिले आहेत.

हिप्परगा रवा येथे गेल्या काही काळापासून वीजबिले वेळेवर वाटप न करता निष्काळजीपणा केला जात होता. परिणामी, ग्राहकांना विलंब शुल्काचा भुर्दंड सहन करावा लागत होता. नागरिकांच्या या समस्येला 'दैनिक राज्य लोकतंत्र न्युज ने वाचा फोडताच लोहारा विभागाच्या अधिकाऱ्यांनी वस्तुस्थितीची गंभीर दखल घेतली. कामात हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित वीज बिल वाटप कंपनीवर तसेच स्थानिक वायरमनवर तातडीने चौकशी करून कारवाईचे निर्देश दिले.

अधिकाऱ्यांच्या या तत्पर भूमिकेमुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, जनतेतून समाधान



व्यक्त होत आहे. कर्तव्याशी बांधील राहून जनतेच्या प्रश्नांची त्वरित दखल घेणाऱ्या अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांमुळेच सामान्यांना खरा न्याय मिळतो, अशी भावना परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

तसेच जनतेच्या समस्येला प्रभावीपणे मांडल्याबद्दल 'दैनिक राज्य लोकतंत्र न्युज चे 'ही सर्व स्तरातून आभार मानले जात आहेत.

## अवसरी खुर्दमधील मंदिर परिसर स्वच्छतेसाठी ६० डझबीनचे वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर : प्रतिनिधी

अवसरी खुर्द ग्रामपंचायतीच्या वतीने गावठाण तसेच विविध वाड्या-वस्त्यांवरील मंदिर परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी ६० डझबीनचे वाटप करण्यात आले. मंदिराच्या सभामंडपासाठी ३० मोठे, तर मंदिराच्या गाभाऱ्यासाठी ३० छोटे डझबीन देण्यात आले. पंचायत समिती सदस्य निलेश टेमकर यांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले.

ग्रामपंचायतीच्या या उपक्रमामुळे मंदिर परिसरातील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यास मदत होणार असून, धार्मिक स्थळांच्या स्वच्छतेलाही चालना मिळणार आहे. याबाबतची माहिती प्रशासक सरपंच प्रसाद कराळे यांनी दिली.

यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती संतोष भोर, भीमाशंकर साखर कारखान्याचे संचालक आनंद शिंदे, शांताराम अभंग, वसंत शिंदे,



देविदास शिंदे, राजू राठोड आणि ग्रामविकास अधिकारी जगन्नाथ शिंदोरे उपस्थित होते. अवसरी खुर्द गावातील श्री काळभैरवनाथ मंदिर, पेशवेकालीन गणेश मंदिर, रानुबाई माता मंदिर, दत्त मंदिर सुतारआळी, नवतरुण गणेश मंदिर, श्री स्वामी समर्थ मंदिर, देवीआई मंदिर, कराळेवाडी श्री गणेश मंदिर, सटवाई माता मंदिर, पंधराबिघा भवानी माता मंदिर, शिंदेमळा वेताळेश्वर मंदिर, कानिफनाथ मंदिर, भोरवाडी कमलजादेवी मंदिर आणि वायळमळा सत्यदेव महाराज मंदिर यांसह विविध मंदिरांच्या परिसरात हे डझबीन उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नागरिकांनी तसेच देवदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी प्लास्टिक व अन्य कचरा परिसरात न टाकता डझबीनमध्येच टाकावा. मंदिर परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी ग्रामपंचायतीला सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासक सरपंच प्रसाद कराळे यांनी केले.

## धामणीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

समस्त ग्रामस्थ धामणी, शिरदाळे, पहाडदरा व ज्ञानेश्वरवस्ती यांच्या संयुक्त विद्यमाने धामणी येथे श्री अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहादरम्यान दररोज नामस्मरण, प्रवचन व कीर्तनाचे कार्यक्रम होणार असून, विविध मान्यवर कीर्तनकारांची कीर्तनसेवा भाविकांना लाभणार आहे.

सप्ताहातील कीर्तनसेवेचे नियोजन पुढीलप्रमाणे आहे.

* शनिवार, दि. २९ ऑगस्ट : ह.भ.प. प्रकाश महाराज साठे विनोदाचार्य (बीड)

* रविवार, दि. ३० ऑगस्ट : ह.भ.प. सोपान



महाराज सानप शास्त्री (हिंगोली)

* सोमवार, दि. ३१ ऑगस्ट : रामायणाचार्य ह.भ.प. रामराव महाराज ठोक (नागपूर)

* मंगळवार, दि. १ सप्टेंबर : ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर)

* बुधवार, दि. २ सप्टेंबर : ह.भ.प. पांडुरंग महाराज घुले (देहू)

* गुरुवार, दि. ३ सप्टेंबर : ह.भ.प. माऊली महाराज कदम (छोटे माऊली-आळंदी)

* शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर : ह.भ.प. महादेव महाराज राऊत (बीड)

* शनिवार, दि. ५ सप्टेंबर : ह.भ.प. विष्णू महाराज केंद्रे यांचे रात्री ९ ते ११ या वेळेत कीर्तन होणार असून, याच दिवशी सप्ताहाचा समारोप व काल्याचे कीर्तन होईल.

सप्ताहाच्या निमित्ताने परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नामस्मरण, प्रवचन व कीर्तनाचा आध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# धामणीतील धार्मिक परंपरा, विवाह सोहळ्याची रंगत आणि भाविकांची मोठी उपस्थिती

## धामणीत खंडोबा-बाणाईचा शाही विवाह सोहळा जल्लोषात

### 'सदानंदाचा येळकोट'च्या जयघोषाने दुमदुमले मंदिर परिसर; भंडारा, खोबरे उधळून भाविकांचा उत्साह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

धामणी (ता. आंबेगाव) श्रावण पौर्णिमेचे औचित्य साधत धामणी येथील श्री खंडोबा देवस्थान मंदिराच्या प्रांगणात शुक्रवारी (दि. २८) खंडोबा-बाणाईचा पारंपरिक शाही विवाह सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. सनई, तुतारी व ढोलाच्या निनादात, तसेच शेकडो भाविकांच्या उपस्थितीत झालेल्या या विवाह सोहळ्यात 'सदानंदाचा येळकोट'च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. यावेळी भाविकांनी भंडारा व खोबरे उधळून आनंदोत्सव साजरा केला.

शुक्रवारी पहाटे श्रावण पौर्णिमा अर्थात राखी पौर्णिमेनिमित्त खंडोबा मंदिरातील स्वयंभू सप्तशिवलिंगाचा अकरा जोडप्यांच्या हस्ते रुद्राभिषेक व दुग्धाभिषेक करण्यात आला. त्यानंतर भाविकांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली. सेवेकरी दादाभाऊ भगत, प्रभाकर भगत, सुभाष तांबे, शांताराम भगत, राजेश भगत, नामदेव भगत, अनिरुद्ध वाळूंज यांच्यासह महिला भाविकांनी स्वयंभू सप्तशिवलिंग तसेच खंडोबा व बाणाईच्या पंचधातूच्या मुखवट्यांना चंदनउटीचा लेप लावला. त्यावर सुगंधी दवणाच्या अत्तरात मिश्रित केलेली पिवळीधम्मक हळद लावण्यात आली.

विवाह सोहळ्यानिमित्त मंदिराच्या गाभाऱ्यात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. खंडोबा व बाणाईच्या मूर्तींना बाशिंग व मुंडावळ्या बांधून आकर्षक वस्त्रालंकार करण्यात आले. सकाळी सहा वाजता सजविलेल्या खंडोबा व बाणाईच्या मुखवट्यांची मिरवणूक मंदिरात आणण्यात आली. मंदिराच्या आवारात महिलांनी नवरदेव खंडोबाच्या मुखवट्याचे औक्षण करून स्वागत केले.

यानंतर सनई, तुतारी व ढोलाच्या गजरात बाशिंग-मुंडावळ्या धारण केलेला आणि हिरवी साडी व वस्त्रालंकारांनी सजविलेला बाणाईचा मुखवटा सेवेकरी मंडळींनी लग्नमंडपात वाजतगाजत आणला. मंगलाष्टकांना सुरुवात होताच खंडोबा व बाणाईच्या मुखवट्यांवर फुलांच्या पाकळ्या, अक्षता व भंडारा उधळण्यात आला. वाद्यांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि 'सदानंदाचा येळकोट'च्या जयघोषात खंडोबा-बाणाईचा विवाह सोहळा संपन्न झाला.

विवाह सोहळ्यानंतर उपस्थित वऱ्हाडी मंडळी व भाविकांना



प्रसादाचे वाटप करण्यात आले. या शाही विवाह सोहळ्याचे पौरोहित्य प्रमोद देखणे, पोपट भोजने, गणपत भोजने, गणेश जारकर व भाऊ भोजने यांनी केले. यावेळी सेवेकरी, मानकरी मंडळी तसेच पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला भाविकांची उपस्थिती विशेष लक्षणीय होती.

दरम्यान, खंडोबा मंदिराच्या दोन्ही महाद्वारांच्या बाजूला दगडी दीपमाळ उभारण्याच्या कामाचा शुभारंभही यावेळी करण्यात आला. येत्या चंपाषष्ठीपर्यंत दीपमाळेचे काम पूर्ण करण्याचा मानस ग्रामस्थ व सेवेकरी मंडळींनी व्यक्त केला.

## आयुक्तांच्या भेटीसाठी आलेल्या नागरिकांना प्रतीक्षेचा फटका! ठरलेल्या वेळेत भेट न झाल्याने संताप; सुरक्षारक्षकांशी बाचाबाची

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर तोडगा काढण्यासाठी महापालिका आयुक्तांची भेट ही नागरिकांसाठी महत्त्वाची असते. मात्र, आयुक्तांच्या भेटीसाठी महापालिका मुख्यालयात येणाऱ्या नागरिकांनाच प्रतीक्षा आणि अडथळ्यांचा सामना करावा लागत असल्याचा प्रकार समोर आला आहे. गुरुवारी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या भेटीसाठी आलेल्या नागरिकांना ठरलेल्या वेळेत भेट न मिळाल्याने त्यांचा संताप अनावर झाला.

काही नागरिक आपल्या विविध समस्या घेऊन महापालिका मुख्यालयात आयुक्तांच्या भेटीसाठी आले होते. मात्र, बराच वेळ प्रतीक्षा करूनही भेट कधी होणार, याबाबत स्पष्ट माहिती मिळत नसल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. आम्हीही आमचा वेळ काढून इथे आलो आहोत, असा त्रागा काही नागरिकांनी व्यक्त केला.

दरम्यान, नागरिकांना अडविण्याचा सुरक्षारक्षकांकडून प्रयत्न झाल्याने वातावरण अधिकच तापले. यावेळी काही नागरिक आणि सुरक्षारक्षकांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. त्यामुळे महापालिका मुख्यालयात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

महापालिका प्रशासनाकडून नागरिकांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी विविध पातळ्यांवर व्यवस्था करण्यात येते. त्यात आयुक्तांची थेट भेट ही महत्त्वाची बाब मानली जाते. मात्र, भेटीसाठी वेळ घेऊन आलेल्या नागरिकांना ताटकळत ठेवले जात असेल, तर प्रशासनाच्या 'नागरिककेंद्री कारभाराचा' नेमका अर्थ काय?, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

नागरिकांच्या तक्रारी, समस्या आणि मागण्यांना थेट प्रशासनाच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी भेटीची प्रक्रिया सुलभ असणे अपेक्षित आहे. त्यासाठी आयुक्तांच्या नागरिक भेटीची निश्चित वेळ, प्रतीक्षा करणाऱ्या नागरिकांना योग्य माहिती आणि सुरक्षाव्यवस्थेच्या नावाखाली अनावश्यक अडथळे होणार नाहीत, याची दक्षता घेण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

नागरिकांनी वेळ काढून महापालिका मुख्यालयात यावे आणि त्यानंतर त्यांनाच तासन्तास प्रतीक्षा करावी लागावी, ही परिस्थिती प्रशासनासाठी निश्चितच आत्मपरीक्षणाची बाब ठरली आहे. नागरिकांच्या समस्या ऐकणे ही प्रशासनाची कृपा नसून जबाबदारी आहे, याची जाणीव महापालिका प्रशासनाने ठेवण्याची गरज व्यक्त होत आहे.

# आपुलकीच्या धाग्याने जोडले सेवा आणि सुरक्षेचे बंध

## रक्षाबंधनानिमित्त विद्यार्थिनींकडून अधिकारी, पोलीस व सुरक्षा रक्षकांना राखी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

रक्षाबंधन म्हणजे केवळ भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा उत्सव नव्हे, तर एकमेकांच्या सुख-दुःखात साथ देण्याची आणि रक्षणाची भावना जपणारा सण आहे. याच भावनेला सामाजिक कृतज्ञतेची जोड देत चिखली येथील इनाव्हेटिव्ह वर्ल्ड स्कूलच्या विद्यार्थिनींनी अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे केले.

शहराच्या सुरक्षिततेसाठी तसेच नागरिकांच्या सेवेसाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या महापालिका अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा रक्षक आणि पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांना विद्यार्थिनींनी राखी बांधून आपुलकी, सन्मान आणि कृतज्ञतेचा संदेश दिला.

महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत आयोजित या उपक्रमात विद्यार्थिनींनी नगरसदस्य विकास साने, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि विशेष अधिकारी किरण गायकवाड यांची भेट घेतली. विद्यार्थिनींनी त्यांना राखी बांधून औक्षण केले. यानंतर महापालिका परिसराची सुरक्षा सांभाळणाऱ्या सुरक्षा रक्षकांनाही राखी बांधून त्यांच्या सेवेला सलाम करण्यात आला. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कर्तव्य बजावणाऱ्या पिंपरी-चिंचवड पोलीस विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनाही विद्यार्थिनींनी राखी बांधली. समाजाच्या सुरक्षिततेसाठी प्रतिकूल परिस्थितीतही कर्तव्य बजावणाऱ्या या सेवाव्रतींप्रती विद्यार्थिनींनी कृतज्ञता व्यक्त केली.

**राखीनंतर मनमोकळा संवाद**

राखी बांधल्यानंतर विद्यार्थिनींनी अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांशी मनमोकळा संवाद साधला. रक्षाबंधनाचा सण केवळ कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता शहर आणि समाजाच्या सेवेसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी म्हणून या उपक्रमाकडे पाहत असल्याची भावना विद्यार्थिनींनी व्यक्त केली.

यावेळी विद्यार्थिनींनी रक्षाबंधनाचे



महत्त्व, भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेम, जिव्हाळा आणि परस्पर रक्षणाची भावना अधोरेखित करणारे गीत सादर केले. विद्यार्थिनींच्या निरागस स्वरांनी आणि उत्स्फूर्त सहभागाने महापालिका परिसरातील वातावरण प्रसन्न झाले.

**राखीच्या धाग्यातून सामाजिक बांधिलकी**

रक्षाबंधनातील राखीचा धागा हा केवळ दोन व्यक्तींमधील नात्याचे प्रतीक नसून समाजातील परस्पर विश्वास, सुरक्षितता, सन्मान आणि सामाजिक बांधिलकीचा धागाही ठरू शकतो, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

आपल्या कुटुंबातील सदस्यांप्रमाणेच समाजाच्या सुरक्षिततेसाठी आणि नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असलेल्या अधिकारी, कर्मचारी, पोलीस आणि सुरक्षा रक्षकांप्रती विद्यार्थिनींनी व्यक्त केलेली कृतज्ञता हा रक्षाबंधनाच्या सणाचा सामाजिक अर्थ अधिक व्यापक करणारा ठरला.

## सारांश वृत्त

### लष्करी गुप्तचर यंत्रणेच्या माहितीवरुन पुण्यात छापा; तीन बांगला देशी ताब्यात, विशेष शाखा आणि मिलिटरी इंटेलिजन्सची संयुक्त कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

लष्करी गुप्तचर यंत्रणेकडून मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पुणे पोलिसांच्या विशेष शाखा आणि मिलिटरी इंटेलिजन्सने संयुक्त कारवाई करत शहरात बेकायदेशीरपणे वास्तव्यास असलेल्या ३ बांगला देशी नागरिकांना ताब्यात घेण्यात आले आहे. सोनिया अख्तर, मोतिआर गाजी आणि सोनिया मोती पान अशी या बांगला देशी नागरिकांची नावे आहेत. २७ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता ही कारवाई करण्यात आली आहे. लष्करी इंटेलिजन्सकडे काही बांगला देशी नागरिक बेकायदेशीरपणे शहरात वास्तव्यास असल्याची माहिती प्राप्त झाली होती. या माहितीची पडताळणी केल्यानंतर संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. प्राथमिक चौकशी दरम्यान त्यांच्या त्यांच्या भारतातील वास्तव्याबाबत तसेच देशात प्रवेश करण्याच्या मार्गाबाबत माहिती घेण्यात आली. त्यांच्याकडे भारतात वास्तव्यासाठी आवश्यक वैध कागदपत्रे नसल्याचे तपासात निष्पन्न झाले. दरम्यान, तिघांविरुद्ध स्थानबद्धतेचे आदेश काढण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली असून त्यानंतर त्यांना बांगला देशात परत पाठवण्याची प्रक्रिया केली जाणार आहे. शहरातील संवेदनशील भागांमध्ये बेकायदेशीरपणे वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास आणि पडताळणीची मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. वैध कागदपत्रांशिवाय शहरात वास्तव्यास असलेल्या नागरिकांवर लक्ष ठेवण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.

# भाजपच्या सत्तेतच 'समन्वयाचा शॉर्टसर्किट'!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेत स्पष्ट बहुमत मिळवून एकहाती सत्ता स्थापन केल्यानंतर भाजपसमोर विरोधकांचे आव्हान फारसे मोठे उरलेले नाही. पण सत्ता बाहेरच्या विरोधकांमुळे नव्हे, तर घरातील विसंवादामुळे अडखळू लागली असेल तर त्यापेक्षा मोठे राजकीय अपयश कोणते? महासभा वारंवार तहकूब होण्याची वेळ येत असेल, महत्त्वाचे विकासाचे प्रस्ताव रखडत असतील आणि सत्ताधारी पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांमध्येच समन्वयाचा अभाव दिसत असेल, तर हा केवळ प्रशासकीय प्रश्न राहत नाही; तो सत्तेच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा विषय ठरतो.

पिंपरी-चिंचवडकरांनी भाजपला स्पष्ट बहुमत दिले ते शहराचा कारभार चालविण्यासाठी, सत्ताकेंद्रांची निर्मिती करण्यासाठी नव्हे. महापौर, सत्तारूढ पक्षनेते, स्थायी समिती अध्यक्ष, आमदार आणि पक्ष संघटनेतील वरिष्ठ पदाधिकारी प्रत्येकाची भूमिका महत्त्वाची आहे. पण या भूमिका एकमेकांना पूरक ठरण्याऐवजी परस्परांवर प्रभाव टाकण्याच्या स्पर्धेत उतरल्या, तर प्रशासनाचा गाडा रुळावरून घसरण्यास वेळ लागत नाही.

महासभा तहकूब होणे ही त्याची धोक्याची घंटा आहे. महासभा म्हणजे केवळ नगरसेवकांची बैठक नव्हे; ती शहराच्या विकासाचे निर्णय घेणारे लोकशाही व्यासपीठ आहे. रस्ते, पाणी, वाहतूक, मेट्रो, ई-आरटीएस, पार्किंग, सार्वजनिक शौचालये अशा विषयांवरील निर्णय राजकीय अंतर्गत कुरघोड्यांमध्ये अडकत असतील तर त्याची किंमत शेवटी नागरिकांनाच मोजावी लागते.

प्रदेश नेतृत्वाने या प्रकाराची दखल घेतली आणि शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन 'समन्वयाचा डोस' दिला, ही बाब भाजपसाठी आत्मपरीक्षणाची संधी आहे. मात्र प्रश्न एवढाच आहे की बैठकीत समन्वयाचे डोस देऊन प्रश्न सुटणार आहे की सत्तेच्या राजकारणातील मूळ दुखणे शोधले जाणार आहे?

कारण प्रश्न केवळ व्यक्तींच्या समन्वयाचा नाही. प्रश्न आहे तो सत्ताकेंद्रांच्या वाढत्या संख्येचा. निर्णय कोण घेणार, अंतिम शब्द कोणाचा, पक्षाचा निर्णय आणि महापालिकेतील निर्णय यामध्ये सीमारेषा कोण आखणार, या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे नसतील तर संघर्ष पुन्हा उफाळणारच.

शहराध्यक्षांनी 'पक्षशिस्त' आणि 'कारवाई'चा इशारा दिला आहे. शिस्त आवश्यकच. पण लोकशाही व्यवस्थेत शिस्तीचा अर्थ केवळ आदेश पाळणे एवढाच नसतो. नागरिकांच्या प्रश्नांवर चर्चा, मतभेदांवर संवाद आणि निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता हीदेखील तितकीच आवश्यक असते. मतभेद दाबून ठेवले म्हणून ते संपत नाहीत; उलट ते कधीतरी महासभेच्या कामकाजात, प्रशासनाच्या निर्णयांत किंवा सार्वजनिक पातळीवर उफाळून येतात.

भाजपसमोर आता खरी कसोटी आहे. विरोधकांना दोष देणे सोपे आहे; पण स्वतःच्या घरातील विसंवादावर नियंत्रण ठेवणे कठीण. एकहाती सत्ता मिळाल्यानंतरही जर 'एकमत' निर्माण करता येत नसेल, तर बहुमताचा अर्थ काय?

पिंपरी-चिंचवड ही झपाट्याने वाढणारी औद्योगिक आणि नागरी महानगरी आहे. येथे निर्णय घेण्यास विलंब म्हणजे केवळ कागदावरील विलंब नाही; त्याचा परिणाम वाहतूक, पाणी, सार्वजनिक सुविधा, पर्यावरण आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होतो. त्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या अंतर्गत राजकारणासाठी शहराला ओलीस ठेवण्याचा अधिकार कोणालाही नाही.

भाजपने सत्ता मिळविली आहे; आता सत्ता चालविण्याची क्षमता सिद्ध करावी लागेल. महासभा सुरळीत चालविणे ही सुरुवात आहे. त्यानंतर निर्णय प्रक्रियेतील पारदर्शकता, पदाधिकाऱ्यांमधील स्पष्ट अधिकारवाटप आणि विकासकामांना गती देणे आवश्यक आहे.

अन्यथा 'एकहाती सत्ता' ही ताकद न राहता अंतर्गत संघर्षाचे रणांगण बनेल.

भाजपच्या सत्तेत निर्माण झालेला हा 'समन्वयाचा शॉर्टसर्किट' वेळेत दुरुस्त केला नाही, तर फ्यूज फक्त महासभेचा उडणार नाही सत्तेवरील जनतेच्या विश्वासाचाही उडू शकतो.

## लग्नाच्या नावाखाली महिलांची 'विक्री'? मेवातमधील 'पारो-मोलकी' विवाहांची राष्ट्रीय महिला आयोगाकडून चौकशी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

हरियाणातील नूंह जिल्ह्यासह मेवात परिसरात लग्नाच्या नावाखाली महिलांची कथित खरेदी-विक्री आणि शोषण होत असल्याच्या गंभीर आरोपांची दखल राष्ट्रीय महिला आयोगाने घेतली आहे. या प्रकरणाची वस्तुस्थिती तपासण्यासाठी आयोगाने पाच सदस्यीय तथ्यशोधन समिती स्थापन केली आहे. या समितीमध्ये दोन निवृत्त भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी यांचा समावेश आहे. समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी १० दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

मेवात परिसरात प्रचलित असल्याचे सांगितले जाणारे 'पारो' किंवा 'मोलकी' विवाह या चौकशीच्या केंद्रस्थानी आहेत. या प्रकारात आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील किंवा इतर राज्यांमधील महिलांना मध्यस्थांच्या माध्यमातून मेवात परिसरात आणले जाते आणि त्यांचे स्थानिक पुरुषांशी विवाह लावून दिले जात असल्याचे आरोप आहेत.

गंभीर बाब म्हणजे, या व्यवहारांमध्ये मध्यस्थांना किंवा संबंधित कुटुंबांना पैशांची देवाणघेवाण केली जात असल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे हा प्रकार केवळ विवाहाची सामाजिक प्रथा आहे की त्यामागे महिलांची तस्करी, जबरदस्ती आणि आर्थिक शोषणाचे जाळे आहे, याचा शोध आता समिती घेणार आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या नेतृत्वाखालील आयोगाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. समिती स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून संबंधित महिला, कुटुंबे, स्थानिक प्रशासन आणि इतर संबंधित व्यक्तींशी संवाद साधण्याची शक्यता आहे. या चौकशीचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे महिलेची संमती नेमकी किती स्वतंत्र असते? गरिबी, आर्थिक असुरक्षितता किंवा मध्यस्थांचा दबाव यामुळे विवाहासाठी महिलांना दुसऱ्या राज्यात नेले जात असेल, तर त्याला पारंपरिक विवाह म्हणायचे की मानवी तस्करी? १० दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## भारताच्या संरक्षणाला नवी धार! अमेरिकेसोबत 'जॅव्हलिन' क्षेपणास्त्रासाठी मोठा करार; रणगाड्यांना भेदण्याची क्षमता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

कोटा : प्रतिनिधी ।

भारत आणि अमेरिका यांच्या संरक्षण सहकार्याला आणखी एक महत्त्वाचा टप्पा मिळाला आहे. भारताने अमेरिकेसोबत 'जॅव्हलिन' रणगाडाविरोधी मार्गदर्शित क्षेपणास्त्र प्रणाली खरेदी करण्यासाठी महत्त्वाच्या करारावर स्वाक्षरी केली आहे. २८ ऑगस्ट २०२६ रोजी नवी दिल्लीत भारत आणि अमेरिकेदरम्यान खरेदी प्रस्ताव आणि स्वीकृतीपत्रावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. हा व्यवहार अमेरिकेच्या परदेशी लष्करी विक्री व्यवस्थेअंतर्गत करण्यात येणार आहे.

'जॅव्हलिन' ही अत्याधुनिक रणगाडाविरोधी क्षेपणास्त्र प्रणाली आहे. शत्रूचे रणगाडे आणि इतर चिलखती लष्करी वाहने नष्ट करण्यासाठी या प्रणालीचा वापर केला जातो. सध्या ही प्रणाली अमेरिकेचे भूदल आणि अमेरिकेचे सागरी दल वापरत आहे. अमेरिकेबरोबरच अनेक देशांच्या संरक्षण दलांमध्येही 'जॅव्हलिन' प्रणाली कार्यरत आहे.

'जॅव्हलिन' क्षेपणास्त्र प्रणालीची निर्मिती जॅव्हलिन संयुक्त उद्योगसमूह करतो. या उद्योगसमूहामध्ये अमेरिकेतील आरटीएक्स आणि लॉकहीड मार्टिन या दोन प्रमुख संरक्षण कंपन्यांचा समावेश आहे. त्यामुळे या करारामुळे भारताला आधुनिक रणगाडाविरोधी क्षमतेसोबतच अमेरिकेच्या संरक्षण उद्योगासोबत सहकार्य वाढवण्याची संधी मिळणार आहे.

अमेरिकेच्या नवी दिल्लीतील दूतावासाने या कराराचे स्वागत केले आहे. भारत-अमेरिका प्रमुख संरक्षण भागीदारी अधिक मजबूत होत असल्याचे या करारातून स्पष्ट होत असल्याचे अमेरिकेने म्हटले आहे. तसेच दोन्ही देशांमधील संरक्षण उद्योगांच्या भविष्यातील सहकार्याचा मार्ग आणखी मोकळा होणार असल्याचेही सांगण्यात आले.

भारताच्या दृष्टीने या कराराचे महत्त्व मोठे आहे. चीन आणि पाकिस्तानच्या सीमांवरील सुरक्षेची आव्हाने, तसेच रणगाडे आणि चिलखती वाहनांचा संभाव्य वापर लक्षात घेता, अत्याधुनिक रणगाडाविरोधी क्षेपणास्त्र प्रणाली भारतीय सैन्याची प्रतिकारक्षमता वाढवू शकते.

'जॅव्हलिन' करार म्हणजे केवळ शस्त्रखरेदी नाही; तर भारत-अमेरिका संरक्षण भागीदारी अधिक मजबूत करण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे रणनीतिक पाऊल आहे.

# शेतकऱ्याला १, ग्राहकाला ६२! कांद्याच्या दरवाढीवर सरकारचा 'मध्यस्थां'वर ठपका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

कांद्याच्या दराने पुन्हा एकदा सर्वसामान्यांच्या डोळ्यात पाणी आणले आहे. दिल्लीच्या बाजारात २७ ऑगस्टला कांद्याचा किरकोळ दर तब्बल ६२ किलोपर्यंत पोहोचला, तर दुसरीकडे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना हाच कांदा १ किलोपर्यंतच्या अत्यल्प दराने विकावा लागल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे कांद्याच्या दरवाढीचा खरा फायदा कोणाला होतो, हा प्रश्न आता अधिक तीव्र झाला आहे.

केंद्र सरकारने या वाढत्या दरांसाठी काळाबाजार, साठेबाजी आणि अवाजवी नफा कमावणाऱ्या मध्यस्थांना जबाबदार धरले आहे.

ग्राहक व्यवहार मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सरकारने दर नियंत्रणात आणण्यासाठी कांदा ३५ किलो या सवलतीच्या दराने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. दिल्लीसह काही शहरांमध्ये नियुक्त फिरत्या विक्री वाहनांमधून हा कांदा विकला जाणार आहे.

या व्यवस्थेअंतर्गत नाफेड आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ आपल्या किरकोळ विक्री केंद्रांमधून तसेच केंद्रीय भांडारांमधून कांद्याची विक्री करणार आहेत. सरकारच्या



मते, या उपाययोजनांमुळे ग्राहकांना बाजारभावापेक्षा कमी दरात कांदा मिळू शकतो.

मात्र सरकारच्या या स्पष्टीकरणावर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. शेतकऱ्याला १ आणि ग्राहकाला ६२, या दोन टोकांच्या दरांमध्ये तब्बल ६१ किलोचा फरक असेल, तर या संपूर्ण पुरवठा साखळीत अतिरिक्त पैसा नेमका कुठे जातो, याचे उत्तर कोण देणार?

शेतकरी नेते राकेश टिकैत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांना पत्र लिहून कांदा उत्पादकांच्या परिस्थितीकडे लक्ष वेधले होते. बाजारभाव कोसळल्यानंतर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांकडून सरकारने कांदा खरेदी केल्याचे कृषिमंत्र्यांनी सांगितले आहे.

पण आज प्रश्न केवळ कांदा महागला याचा नाही. भाव कोसळला तेव्हा शेतकरी संकटात आणि भाव वाढला तेव्हा ग्राहक संकटात मग या दोन्ही संकटांच्या मध्ये नफा कोण कमावत आहे? सरकारने मध्यस्थांवर आरोप करण्याबरोबरच या संपूर्ण साखळीतील पारदर्शकता आणि शेतकऱ्याला मिळणाऱ्या प्रत्यक्ष भावाचेही उत्तर देणे गरजेचे आहे.

# नेपाळमध्ये पुन्हा महाप्रलयाचं संकट; बॅरियर लेक फुटण्याचा धोका? मृतांचा आकडा ६०० वर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

काठमांडू / वृत्तसंस्था

नेपाळ आणि तिबेटच्या सीमा भागात आलेल्या विनाशकारी पुरामुळे मोठी जीवितहानी झाली. या आपत्तीतील मृतांचा आकडा ६०० वर पोहोचला आहे. तर १,४७३ लोक जखमी झाले असल्याची माहिती नेपाळ पोलिसांनी दिली. शेकडो लोक अजूनही बेपत्ता आहेत. तर अचानक आलेल्या या पुरामुळे नेपाळ- चीन सीमेजवळ तयार झालेले एक मोठे जलाशय (बॅरियर लेक) फुटण्याचा धोका निर्माण झाला असून, यामुळे पुन्हा एकदा महाप्रलय येण्याची शक्यत व्यक्त होत आहे.

हे जलाशय तुडुंब भरून वाहू लागल्याने नेपाळ आणि चीन या दोन्ही देशांनी सतर्कतेचा इशारा दिला आहे. माती, दगडांचा ढिगारा साचून तयार झालेला हा जलाशय फुटण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे बचावकार्य थांबवण्यात आले होते. पण शुक्रवारी दुपारपर्यंत परिस्थिती नियंत्रणात आल्याचे चीनच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. यामुळे बचावकार्ये पुन्हा सुरू करण्यात आले. रसुवा ते चितवन दरम्यानच्या नदीकाठी आणि बाधित भागांत शोधकार्यासाठी १,२०० जणांचे एक पथक तैनात



करण्यात आले आहे. येथील पूरपरिस्थितीची अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेत देखरेख वाढवली आहे. जलाशयातील पाण्याचा प्रवाह वेगाने वाढल्याने सखल भागांमध्ये अचानक पूर येण्याची शक्यता आहे. पुराचा धोका लक्षात घेऊन सखल भागांतील नागरिक उंच ठिकाणी स्थलांतर करत आहेत. अद्याप ९५० हून अधिक लोक बेपत्ता आहेत.

यात ५०० हून अधिक परदेशी नागरिकांचा समावेश आहे. त्यांचा शोध घेतला जात आहे. या ठिकाणी बचावकार्य सुरू आहे.रम्यान, नेपाळमध्ये शोध आणि बचावकार्यासाठी पथके पाठवण्याची तयारी अनेक देशांनी दर्शवली होती. पण नेपाळने मदत नाकारली आहे. आमची सुरक्षा यंत्रणा ही बचावकार्य हाताळण्यास सक्षम असल्याचे नेपाळ सरकारने म्हटले आहे. नेपाळ-चीन सीमेजवळ भोटेकोशी आणि त्रिशूली नदीच्या खोऱ्यांत बुधवारी अचानक भयंकर महाप्रलय आला. या महापुरामुळे सगळीकडे चिखल पसरला आहे.

# पती-पत्नीचा वैवाहिक वाद थेट संपूर्ण कुटुंबावर फौजदारी खटला? कलकत्ता उच्च न्यायालयाचा कठोर इशारा; 'न्यायालयीन छाननी अत्यावश्यक'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

पती-पत्नीमधील वैवाहिक मतभेद हा अनेकदा वैयक्तिक आणि नागरी स्वरूपाचा वाद असतो. मात्र हाच वाद पुढे जाऊन पतीसह त्याच्या संपूर्ण विस्तारित कुटुंबाविरुद्ध गंभीर फौजदारी गुन्ह्यांमध्ये रूपांतरित होत असेल, तर अशा प्रकरणांकडे न्यायालयांनी अत्यंत काळजीपूर्वक पाहिले पाहिजे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण कलकत्ता उच्च न्यायालयाने केले आहे. २८ ऑगस्ट २०२६ रोजी न्यायमूर्ती उदय कुमार यांनी हे निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने स्पष्ट केले की, वैवाहिक दुरावा आणि त्रासदायक फौजदारी खटला यांच्यातील सीमारेषा अत्यंत नाजूक असते. त्यामुळे एका जोडीदाराने नागरी उपाययोजना सुरू केल्यानंतर संपूर्ण कुटुंबावर गंभीर फौजदारी आरोप लावले जात असतील, तर त्याची कठोर न्यायालयीन छाननी आवश्यक आहे.

मात्र या निरीक्षणाचा अर्थ असा नाही की प्रत्येक वैवाहिक वादातील फौजदारी गुन्हा सुरुवातीलाच रद्द केला जाईल. याच प्रकरणात उच्च न्यायालयाने पती आणि त्याच्या कुटुंबीयांविरोधातील फौजदारी कारवाई रद्द करण्यास नकार दिला. प्रकरणात बलात्कार, क्रूरता, मारहाण, विश्वासघात, धमकी आणि हुंडाबंदी कायद्यातील गुन्ह्यांचे आरोप करण्यात आले होते. पोलिसांनी तपास पूर्ण करून आरोपपत्र दाखल केले असल्याने, या टप्प्यावर पुराव्यांचे मूल्यमापन करून खटला संपवणे योग्य ठरणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

या प्रकरणाची पार्श्वभूमीही महत्त्वाची आहे. संबंधित पती-पत्नीचा विवाह १७ एप्रिल २०२२ रोजी झाला आणि त्याची नोंदणी १२ मे २०२२ रोजी विवाह निबंधकाकडे करण्यात आली. पतीच्या म्हणण्यानुसार, पत्नी १५ मे २०२२ रोजी आजारी बहिणीला भेटण्याच्या कारणाने माहेरी गेली आणि त्यानंतर वैवाहिक घरी परतली नाही. दुसरीकडे पत्नीने आपल्यावर शारीरिक आणि मानसिक अत्याचार झाल्याचा आरोप केला. तसेच १० मे २०२२ रोजी पतीच्या भावाने आपल्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर आरोपही तिने केला.

यानंतर पतीने क्रूरता आणि परित्यागाच्या कारणावरून विवाहविच्छेदासाठी ३० मे २०२३ रोजी बारासात जिल्हा न्यायालयात वैवाहिक दावा दाखल केला. त्यानंतर पत्नीने १८ जुलै २०२३ रोजी इको पार्क पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिस तपासानंतर पती आणि त्याच्या विस्तारित कुटुंबातील अनेक सदस्यांविरोधात आरोपपत्र दाखल करण्यात आले. या आरोपपत्रात भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८-अ, ३२३, ३७६, ४०६, ५०६, १०९ आणि ३४, तसेच हुंडाबंदी कायद्याच्या कलम ३ आणि ४ अंतर्गत आरोपांचा समावेश होता. आरोपपत्र क्रमांक २१४/२०२३ असून ते इको पार्क पोलीस ठाणे प्रकरण क्रमांक १६८/२०२३ मधून निर्माण झाले.

पती आणि कुटुंबीयांनी या फौजदारी कारवाईला वैवाहिक खटल्याचा 'प्रतिकार म्हणून दाखल केलेला खोटा खटला' असल्याचा दावा केला. विशेषतः, कथित लैंगिक अत्याचार १० मे २०२२ रोजी झाल्याचा आरोप असून त्यानंतर केवळ दोन दिवसांनी, १२ मे रोजी, पत्नीने विवाहाची औपचारिक नोंदणी केली होती, याकडे बचाव पक्षाने लक्ष वेधले. तसेच विवाहविच्छेदाच्या प्रकरणाची नोटीस मिळाल्यानंतरच फौजदारी तक्रार दाखल झाल्याचा युक्तिवाद करण्यात आला.

मात्र उच्च न्यायालयाने या घटनाक्रमाच्या आधारे सुरुवातीलाच गुन्हा रद्द करण्यास नकार दिला. पोलिस तपासात दंड प्रक्रिया संहितेच्या कलम १६४ अंतर्गत नोंदवलेला जबाब, साक्षीदारांचे जबाब, जप्ती पंचनामे आणि वैद्यकीय कागदपत्रे यांसारखी सामग्री समोर आली असल्याचे न्यायालयाने नोंदवले. त्यामुळे आरोपांमध्ये प्रथमदर्शनी आधार असताना उच्च न्यायालयाने या टप्प्यावर पुराव्यांची विश्वासार्हता तपासणे योग्य ठरणार नाही.

न्यायालयाने स्पष्ट केले की, घटनांच्या तारखांमधील विसंगती, तक्रार दाखल करण्याची वेळ किंवा बचाव पक्षाचे म्हणणे हे पुराव्यांच्या मूल्यमापनाशी संबंधित प्रश्न आहेत. अशा बाबींची खरी परीक्षा प्रतिपरीक्षण आणि पूर्ण खटल्यादरम्यानच होऊ शकते. उच्च न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या 'कप्तान सिंह विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य' या निर्णयाचाही संदर्भ दिला. आरोपपत्र दाखल झाल्यानंतर उच्च न्यायालयाने पुरावे तोलून पाहणे किंवा खटल्याची छोट्या स्वरूपात सुनावणी करणे टाळले पाहिजे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

या निर्णयाचा महत्त्वाचा संदेश असा आहे की महिलांच्या गंभीर आरोपांकडे दुर्लक्ष करता येणार नाही; पण त्याच वेळी वैवाहिक संघर्षाचा आधार घेऊन निरपराध कुटुंबीयांना फौजदारी प्रक्रियेत ओढले जात आहे का, याचीही न्यायालयांनी कठोर तपासणी केली पाहिजे. मात्र या प्रकरणातप्रथमदर्शनी पुरावे उपलब्ध असल्याने कारवाई रद्द करण्याचे कारण नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.